पुढारी

# विद्यार्थ्यांना घरबसल्या अभ्यासासाठी मूक, मूडल ई-कंटेंटची सुविधा

## शिवाजी विद्यापीठाचा उल्लेखनीय उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना प्रादुर्भाव विद्यार्थ्यांना होऊ नये, यासाठी शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना घर बसल्या अभ्यास करता यावा, यासाठी मूक, मूडल याच्या माध्यमातून ओपन सोर्स लर्निंग ई-कंटेंट उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा अभ्यासासाठी मदत होणार असून दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत ऑनलाईन अभ्यासक्रम निर्मितीसह मूक, मूडल आदी ऑनलाईन साधनांचा ऑनलाईन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसाठी वापर सुरू केला आहे. वर्गामधील नियमित अध्यापनाला ऑनलाईन अध्ययनाची जोड लाभल्याने विद्यार्थ्यांना विषय समजावून घेणे व त्याचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. विद्यापीठाने ३१ मार्चपर्यंत वर्गातील अध्यापन बंद केले आहे. अशा परिस्थितीत ऑनलाईन अध्यापन व अध्ययन प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी सज्ज झाली आहे. विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी 'मूडल' प्रणाली विकसित केली आहे. विषय व कोर्सनुसार अभ्यासक्रमाची लेक्चर्स, नोटस्, पॉवर पाईंट प्रेझेंटेशन 'मूडल'वर ठेवण्यात आले आहेत. शिक्षकांनी त्यांच्या अकौंटवर अपलोड केलेले शैक्षणिक साहित्य पाहून विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यासता येणार आहे.

> कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थी, शिक्षकांना घरी राहूनच काम करण्याबद्दल सूचना देण्यात आल्या आहेत. घरी राहून त्यांच्या अभ्यासावर परिणाम होऊ नये म्हणून विविध ई-कंटेंटच्या माध्यमातून अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,**
> कुलगुरू विद्यापीठ

Kolhapur Edition
22 Mar, 2020 Page No. 12
Powered by : erelego.com

# 'वर्क फ्रॉम होम'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी गर्दीमध्ये न जाणे हा सर्वोत्तम पर्याय आहे. गर्दी टाळण्यासाठी बँकांच्या आर्थिक व्यवहारासह इतर कामकाज घरबसल्या ऑनलाईन करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.



ग्राहकांनी बँकेत येण्यापेक्षा इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, पैसे भरण्याचे मशीन तसेच एटीएमचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात एकूण ३८ बँका कार्यरत असून त्यांच्या ६२८ शाखा कार्यरत आहेत. गर्दी नियंत्रित करण्यासाठी किमान ग्राहकांना बँका प्रवेश देत आहेत.

याच पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाला सुट्टी देण्यात आली आहे. मात्र, इतर कागदपत्रांसाठी शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन कामकाज करण्याचे आवाहन केले आहे. त्यामध्ये दुबार गुणपत्रक, टीसी, मायग्रेशन, पासिंग मेरिट, गुणतक्ता पडताळणी यासह अन्य कागदपत्रांची मागणी ऑनलाईन करण्याबरोबर त्यासाठीचे शुल्कही ऑनलाईन भरण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

'वर्क फ्रॉम होम' या संकल्पनेचा अवलंब करत घरातूनच ऑनलाईन काम करण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले.

# विद्यार्थ्यांना कागदपत्रे मिळणार पोस्टाद्वारे

**कोल्हापूर, ता. २१ :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे गुणपत्रके, दाखले, प्रमाणपत्रे पाठविण्याची सोय उपलब्ध केली आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. सुविधा केंद्रात न येता विद्यार्थी ऑनलाईन अर्जाद्वारे त्याची मागणी करू शकतात, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी पत्रकाद्वारे दिली. विद्यार्थी सुविधा केंद्रातून दुबार गुणपत्रक, टी.सी./ मायग्रेशन, पासिंग/मेरिट/रँक, ट्रान्सक्रिप्ट, गुणतक्ता पडताळणी व अन्य कागदपत्रांच्या मागणीसाठी www.unishivaji.ac.in संकेतस्थळावर Exam या लिंकवर http://www.unishiavji.ac.in/exam/students-Faciliation-Centre वर अर्ज डाउनलोड करावा. अर्जातील माहिती भरून अर्ज स्कॅन करून तो विद्यार्थी सुविधा केंद्राच्या sfc@unishivaji.ac.in येथे मेल पाठवावा. विद्यार्थ्यांनी डाऊनलोड केलेल्या अर्जावर फी बाबत तसेच पोस्टेज खर्च याविषयी सूचना आहेत. त्याप्रमाणे अर्जाची फी Finance and Account Officer, Shivaji University, payable at Kolhapur. या पत्त्यावर पाठवावी. डी. डी.ची पावती झाल्यानंतर विद्यार्थ्यांची कागदपत्रे काढून त्याला ती पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील. त्यासाठी शासनाच्या लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ 'आपले सरकार' महाऑनलाईन पोर्टलवरून उपलब्ध असणाऱ्या प्रक्रियेचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.



# विद्यापीठात ५० टक्के कर्मचारी निर्णय लागू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने दिलेल्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुरुवारी रात्री याचे परिपत्रक निघाले. राज्य शासनाने यापूर्वीच विद्यार्थ्यांना सुट्टी दिली आहे. मात्र, अधिकची खबरदारी म्हणून शासनातर्फे शासकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शिवाजी विद्यापीठातही ३१ मार्चपर्यंत अधिकारी-कर्मचाऱ्यांना रोटेशनने बोलावले जाणार आहे. त्याचा काहीसा परिणाम शुक्रवारी विद्यापीठात दिसून आला. कोरोनाला रोखण्यासाठी विविध उपाययोजना विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात येत आहेत.

# मल्लखांब स्पर्धेत विद्यापीठ संघाला कास्यपदक

प्रतिनिधी

कोल्हापूर

गुरू नानक विद्यापीठ, अमृतसर या ठिकाणी झालेल्या आखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोप मल्लखांब (महिला) स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने कांस्यपदकाला गवसणी घातली. संघप्रशिक्षक म्हणून डॉ. चंद्रकांत गिरी यांचे व संघव्यवस्थापक डॉ. जी. एस. मुल्लाणी यांचे मार्गदर्शन लाभले. ही स्पर्धा दि. १४ ते १६ एप्रिलदरम्यान पार पडली. या स्पर्धेत देशभरातील ३४ विद्यापीठ संघांनी सहभाग नोंदवला होता. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या महिला संघाने या स्पर्धेत दमदार कामगिरी करत यश संपादन केले.

**स्पर्धेतील सहभागी खेळाडू पुढील प्रमाणे**

पुजा मोरे, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, प्राजक्ता शिंदे, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, प्रणाली जगताप, किसन वीर महाविद्यालय, वाई, अस्मिता मांढरे, किसन वीर महाविद्यालय, वाई, निशा मोळके, श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी - शेख शिरीन, कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.




अमृतसर : विद्यापीठ संघाला गौरवताना मान्यवर.

# ऑनलाईन सुविधांमुळे घरातून अभ्यास शक्य

## विद्यापीठाची एकत्रित अध्यापन प्रक्रिया थांबवण्याची सूचना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थी, शिक्षक यांना ३१ मार्चपर्यंत वर्गामध्ये एकत्र येऊन अध्यापन प्रक्रिया थांबवण्याची सूचना केली आहे. विद्यापीठाच्या ऑनलाईन सेवा-सुविधांमुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या अध्ययन प्रक्रिया सुरू ठेवणे शक्य झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत ऑनलाईन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू केला आहे. वर्गामधील नियमित अध्यापनाला ऑनलाईन अध्ययनाची जोड लाभल्याने विद्यार्थ्यांना विषय समजावून घेणे आणि त्याचा सुनियोजितरीत्या अभ्यास करणे शक्य झाले आहे. विद्यार्थी या सुविधांचा लाभ घेऊन आपल्या अभ्यासात खंड न पडू देण्याचीं दक्षता घेत आहेत.

**मूक, मूडलचा वापर करा**

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षकांना सध्याच्या 'वर्क फ्रॉम होम'चे आवाहन करत असताना विद्यापीठ प्रशासनाने मूक (मासिव्ह ऑनलाईन ओपन कोर्स) आणि मूडल (मॉड्युलर ऑब्जेक्ट ओरिएंटेड



डायनॅमिक लर्निंग एन्व्हायरन्मेंट) या दोन ई-लर्निंग व्यासपीठांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार ऑनलाईन मार्गदर्शन करावे. आपत्कालीन परिस्थितीत थेट अध्यापन करता येत नसले तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची खबरदारी म्हणून ऑनलाईन व्यासपीठांचा मुबलक वापर करावा, अशा सूचना शिक्षकांना देण्यात आल्या. बहुतेक शिक्षकांनी मूक, मूडलच्या आधारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्यापनास प्रारंभही केला, ही समाधानाची बाब आहे. अद्यापही जे विद्यार्थी ऑनलाईन व्यासपीठांचा वापर करत नसतील, त्यांनीसुद्धा मूक, मूडल या व्यासपीठांचा पुरेपूर वापर करून शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले आहे.

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून मास्कचे वाटप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस बांधवांना शिवाजी विद्यापीठाच्या आजी माजी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने मास्कचे वाटप करण्यात आले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख मंजित माने, मराठा महासंघाचे शहराध्यक्ष ऋतुराज माने, रवी इनामदार, महेश राठोड, वैभव जाधव, अवदेश करंबे, रवी वळावेकर, दर्शन जाधव आदी उपस्थित होते.

# रोप मल्लखांब स्पर्धेत विद्यापीठ संघाचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गुरूनानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोप मल्लखांब (महिला) स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने कास्यपदक मिळविले. संघ प्रशिक्षक म्हणून डॉ. चंद्रकांत गिरी यांचे व संघव्यवस्थापक डॉ. जी. एस. मुल्लाणी यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेमध्ये पूजा संतोष मोरे, प्राजक्ता तुषार शिंदे (दोघीही छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा), प्रणाली प्रवीण जगताप, अस्मिता सतीश मांढरे (दोघीही किसन वीर महाविद्यालय, वाई), निशा जितेंद्र मोळके (श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी), शिरीन समद शेख (डी. आर के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर) या खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

# शिवाजी विद्यापीठाची अध्ययन प्रक्रिया ऑनलाईन

कोल्हापूर, ता. २१ : कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थी, शिक्षकांना ३१ मार्चपर्यंत वर्गात एकत्र येऊन अध्यापन प्रक्रिया थांबविण्याची सूचना केली असली तरी विद्यापीठाच्या ऑनलाईन सेवा-सुविधांमुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या अध्ययन प्रक्रिया सुरू ठेवणे शक्य झाले आहे. विद्यापीठाने काही वर्षांत ऑनलाईन अभ्यासक्रम निर्मितीसह MOOC, MOODLE ऑनलाईन उपलब्ध व्यासपीठांचा ऑनलाईन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात वापर करण्यास सुरवात केली. वर्गामधील नियमित अध्यापनाला ऑनलाईन अध्ययनाची जोड मिळाल्याने विद्यार्थ्यांना विषय समजावून घेणे व त्याचा सुनियोजितरित्या अभ्यास करणे शक्य झाले आहे.

**विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी या लिंकचा करावा वापर**

- (SWAYAM)याउपक्रमाचीhttps://swayam.gov.in
- https://www.swayamprabha.gov.in
- (http://ugcmoocs.inflibnet.ac.in/)
- (http://epgp.inflibnet.ac.in/)
- http://www.unishivaji.ac.in/library
- http://www.unishivaji.ac.in/library/E-Books
- http://www.unishivaji.ac.in/library/E-Databases
- http://www.unishivaji.ac.in/library/Resource-Centre-for-Inclusive-Education-(RCIE)

# विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पेमेंटचा वापर करावा; शिवाजी विद्यापीठाचे आवाहन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विद्यार्थी आणि महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी विद्यापीठातील विविध शुल्क ऑनलाईन किंवा पेमेंट गेटवेच्या माध्यमातून भरावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांनी पत्रकाद्वारे केले आहे. जगातील अनेक देशांत कोरोना विषाणूचा प्रसार झाला आहे. या विषाणूचा प्रसार होऊ नये, यासाठी प्रतिबंध म्हणून तातडीने सार्वजनिक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे गरजेचे आहे. यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार उपाययोजनेचा भाग म्हणून विद्यापीठातील गर्दी कमी करण्यासाठी विद्यार्थी, पालक व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन, पेमेंट गेटवे, डी.डी.द्वारे विद्यापीठाच्या बँक खात्यात रक्कम जमा करावी. त्याची मूळ स्लिप जतन करून ठेवावी. कालांतराने मूळ स्लिपच्या आधारे विद्यापीठाची पावती करून घ्यावी, असे पत्रकात म्हटले आहे.

संक्षिप्त

# विद्यापीठातील मानधन, रोजंदारी सेवक उपस्थिती अहवाल १ एप्रिलला द्यावा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातील मानधन, रोजंदारी सेवक उपस्थिती अहवाल १ एप्रिलला देण्यात यावा, अशा सूचना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिल्या आहेत. कोरोना विषाणूवरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स, सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी २० मार्चपासून आपल्या विभागात उपस्थित राहणाऱ्या एकत्रित मानधन व रोजंदारी सेवकांची कार्यालयात असणारी दैनंदिन उपस्थितीची नोंद विभाग, अधिविभागात ठेवायची आहे. या सेवकांच्या उपस्थितीचा अहवाल १ एप्रिल रोजी आस्थापना विभागाकडे जमा करावा, असे आवाहन कुलसचिवांनी पत्रकात केले आहे.

# विद्यापीठाच्या संघाला रोप मल्लखांब स्पर्धेत कांस्यपदक

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोप मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने कांस्यपदक मिळविले आहे. गुरू नानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे झालेल्या आखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोप मल्लखांब (महिला) स्पर्धेत विद्यापीठ संघाने कांस्यपदक मिळविले आहे. यात पूजा मोरे, प्राजक्ता शिंदे, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा; प्रणाली जगताप, अस्मिता मांढरे, किसन वीर विद्यालय वाई; निशा मोळ्के, व्यंकटेश महाविद्यालय, इलकरंजी; शिरीन शेख, डी.आर.के.कॉलेज ऑफ कॉमर्स यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना संघप्रशिक्षक डॉ. चंद्रकांत गिरी, संघव्यवस्थापक डॉ. जी. एस. मुल्लाणी यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# विद्यापीठ सेवक संघास सॅनिटायझर, मास्कचे वाटप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ सेवक संघास अशोकराव माने कॉलेज फार्मसीच्या वतीने सॅनिटायझर व मास्कचे वाटप करण्यात आले. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे. या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून मास्क व सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले.

Kolhapur Edition
22 Mar, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com



कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ३१ मार्चपर्यंत सुटी जाहीर केली आहे. शिक्षण क्षेत्रातील घटकांसह नागरिकांनी सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन घरातच राहावे. हे युद्ध एका अदृश्य शक्तीविरुद्ध आहे. ते घरात राहूनच लढायचे आहे. त्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. 'जनता कर्फ्यू'त सहभागी होऊन नागरिकांनी या शत्रूचा पराभव करण्यासाठी सज्ज राहावे.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ